# डीजिटल इंडिया संकल्पना देशाच्या हितासाठी महत्वपूर्ण

■ प्राचार्य अरविंद चौधरी

डिजिटल इंडिया ही देशाची महत्वाकांक्षी योजना असून देशाचा विकास घडविण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल डिजिटल इंडियाच्या माध्यमातून २७२ सेवा शहरी ते ग्रामीण भागापर्यंत उपलब्ध होणार असून देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल व भरत देश सक्षम बनेल असा विश्वास प्राचार्य अरविंद चौधरी यांनी सेटमांनसिंका महाविद्यालय पाचोरा येथील वाणिज्य विभागाच्या उदघाटन प्रसंगी व्यक्त केला.

पाचोरा महाविद्यालयातील वाणिज्य मंडळाचे उदघाटन दि. २३ सप्टेंबर २०१८ रोजी प्राचार्य अरविंद चौधरी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पाचोरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. बी. पाटील उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून ग्रामिण बँकेच्या सहाय्यक व्यवस्थापक कु. पुनम कानडे उपप्राचार्य डॉ. वले हे उपस्थित होते.

सुमारे दोन तास डिजिटल इंडिया या व्याख्यानाच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभाग प्रमुख प्राध्यापक प्रताप तावरे यांनी केले, सूत्रसंचालन प्राध्यापक पुरी यांनी केले.





